**महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक**

**प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,**

**अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015**

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 08 | एकुण गुण- 100 |
| विषय | - गुन्हेगारी शास्त्र व गुन्हे प्रतिबंध | वेळ - 1000 ते 1300 |
| दिनांक | - 22/01/2015 | वार - गुरुवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :

अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

गुण

**प्र.1 खालील विषयांबाबत मुद्देसूद टिपा लिहा. (प्रत्येकी 04 गुण)** **20**

**अ.** अनैतिक व्यापार (प्रतिबंध कायदा), 1986
**ब.** सराईत : निर्ढावलेला गुन्हेगार.
**क.** कम्युनिटी पोलीसींगची कार्यप्रणाली.
**ड.** गुन्हयाची व्याख्या आणि वैशिष्टये.
**इ.** गुन्हेगारी घटक निर्माण होण्यास कारणीभूत घटक.

**प्र.2** तुम्ही पोलीस ठाणे अधिकारी आहात. गस्त दरम्यान तुम्हास लहान मुले चोरी करतांना मिळून आली आहेत. तेव्हा तुम्ही कशाप्रकारे या मुलांवर कारवाई कराल? अशा लहान मुलांवर कोणत्या कायद्यांतर्गत कारवाई केली जाते? तुम्ही अशा प्रकारची गुन्हेगारी रोखण्यासाठी काय उपाययोजना कराल? **20**

**प्र.3** पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असतांना, नियंत्रण कक्षातून तुम्हास बिनतारी संदेश प्राप्त झाला की, शेजारच्या पोलीस ठाणे हद्दीत काही आतंकवादी यांनी मंदिराच्या आवारातील जत्रेच्या ठिकाणी चार ते पाच ठिकाणी बॉम्ब स्फोट केला आहे. हे आतंकवादी चार चाकी वाहनाने तुमच्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत आहेत. **20**

**तरी खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[अ]** पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी म्हणून तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा व साधन सामुग्रीचा कशा प्रकारे वापर करुन नाकाबंदी कराल?

**[ब]** कोणकोणत्या रस्त्यावर नाकाबंदीसाठी कर्मचारी कशाप्रकारे नेमाल? कोणत्या प्रकारे वाहनांची तपासणी कराल?

**[क]** नाकाबंदीच्या दरम्यान शस्त्रे आणि मनुष्यबळ कमी असल्यास काय कराल?

**[ड]** नाकाबंदी दरम्यान आतंकवादी यांचे वाहन व आतंकवादी मिळून आल्यास काय कारवाई कराल?

**प्र.4** पोलीस स्टेशनमध्ये रात्रीची गस्त करीत असतांना तुम्हाला गुप्तबातमीदारा मार्फत माहिति मिळाली की,पोलीस स्टेशन हद्दीतील हनुमाननगर झोपडपट्टीत काही गुन्हेगार आश्रयासाठी आले असून ते गुन्हा करण्याच्या तयारीत आहेत. अशा वेळी तुम्ही गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी कोणती कारवाई कराल? कोणती दक्षता घ्याल? त्या कारवाईचे फायदे व महत्व विषद करा. **20**

**प्र.5** ज्या पोलीस स्टेशनमध्ये तुम्ही कार्यरत आहात त्या पोलीस स्टेशनमध्ये तीन महिन्यापासून रात्रीचे दरम्यान दररोज 3 ते 4 घरफोडीच्या घटना घडत आहेत. रात्रीचे घरफोडीचे गुन्हे रोखण्यासाठी तुम्ही प्रभारी अधिकारी म्हणून कोणती उपाययोजना कराल? अशा प्रकारे घरफोडी गुन्हयांना आळा घालण्यासाठी कशा प्रकारे प्रतिबंधात्मक कारवाई कराल? याबाबतची सविस्तर योजना लिहा. **10**

**प्र.6** तुमची भिवंडी पोलीस ठाणे येथे प्रभारी अधिकारी म्हणून नेमणूक आहे. पोलीस स्टेशन हद्दीत रात्रीचे घरफोडी, खुन, दरोडे, जातीय दंगलीचे गुन्हयाचे प्रमाण वाढत आहे. सदर प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी आणि हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या माध्यमातून बातमीदार तयार कराल? बातमीदारांच्या माध्यमातून गुन्हे रोखण्यासाठी काय उपाययोजना कराल? याबाबतची सविस्तर माहिती नमूद करा. **10**

***